*ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी इको-प्रो ची परिक्रमा अभिनंदनीय – सुधीर मुनगंटीवार*
==============================================================

इको-प्रो या संस्थेच्या माध्यमातुन महाराष्ट्रातील गडकिल्ले, ऐतिहासिक स्मारकांसोबतच नैसर्गिक वारसा असलेले वने व वन्यजीव, अभयारण्ये व व्याघ्र प्रकल्प यांच्या संरक्षणाचा व संवर्धनाचा संदेश घेवुन निघालेली ही परिक्रमा या पिढीसाठी आदर्शवत असुन हा वारसा जतन करण्याच्या प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाने सहकार्य करुन योगदान देण्याचे आवाहन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.
इको-प्रो चंद्रपूर तर्फे महाराष्ट्र वारसा जतन आणि संवर्धन संदेश परिक्रमेचा शुभारंभ 1 मे रोजी चंद्रपूर येथून करण्यात आला. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या परिक्रमेला हिरवी झेंडी दाखवत शुभेच्छा दिल्या. यावेळी आ नानाजी शामकुळे, महापौर सौ अंजली घोटेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.
इको-प्रो चंद्रपूर या संस्थेने बंडु धोतरे यांच्या नेतृत्वात पर्यावरण संवर्धन व संरक्षणाची जी मोहीम हाती घेतली आहे ती खरोखरच अभिनंनीय आहे. किल्ले स्वच्छतेच्या त्यांच्या मोहीमेची दखल पतंप्रधानांनी घेत मन की बात या कार्यक्रमात त्यांचे कौतुक केले. त्यांची ही परिक्रमा ऐतिहासिक वारसा जपण्याच्या प्रक्रियेमधील मैलाचा दगड ठरेल असेही अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यावेळी बोलतांना म्हणाले.
यावेळी इको-प्रो चे अध्यक्ष बंडु धोतरे यांनी या परिक्रमे संदर्भातील आपली भुमिका विशद केली. हि परिक्रमा चंद्रपूरहुन गडचिरोली, भंडारा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, ठाणे, पालघर, मुंबई, रायगड अशी विविध जिल्हयात जाणार असुन त्या माध्यमातुन गडकिल्ले, ऐतिहासिक वारसा, अभयारण्ये आदिंच्या जतनाचा व संवर्धनाचा संदेश महाराष्ट्राला देणार आहे. या परिक्रमेत बंडु धोतरे यांच्यासह नितीन रामटेके, नितीन बुरडकर, रवी गुरनुले, ललित मुल्लेवार, धर्मेंद्र निनावत, ओम वर्मा, संजय सब्बनवार, राजु काहीलकर, आकाश घोडमारे, सचिन धोतरे, कपिल चौधरी, जितेंद्र वाडके, संदिप जिवने, राजेश व्यास, सुनिल मिलाल आदिंचा सहभाग आहे.